# गुरुवर्य पं. राम माटे - परिचय

पं. राम माटे यांना लहानपणापासूनच संगीताची व नाटकाची आवड होती व ते हार्मोनियम वाजवीत. त्यांनी गायनाचे शिक्षण कै. पं विनायकबुवा पटवर्धन यांचे शिष्य कै. पं विठ्ठलराव घाटे यांचेकडे घेतले. त्यांनी एकीकडे मॅट्रिक व मेकॅनिकलचा डिप्लोमा, त्याचबरोबर संगीत विषारद, हे टप्पे पूर्ण केले व गुरूंच्या प्रोत्साहनाने व आपल्या प्रज्ञापूर्वक मेहनतीने अत्यल्प काळात 1956 साली ते संगीतालंकार झाले. त्यावेळी पं. डी. व्ही. पलुस्कर हे त्यांचे परिक्षक होते, हा दुग्ध - शर्करा योग.

स्वयंप्रेरणेने व गुरूंच्या आशीर्वादाने 1959 साली 'स्वरसाधना संगीत कला केंद्र' या विद्यालयाची स्थापना केली व सुरांच्या सेवेत स्वत:ला समर्पण केले. आजवर विविध कमी - अधिक सांगीतिक पार्श्व भूमीच्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वरज्ञानदानाच्या स्वयंविकसित पद्धतीचा लाभ झाला आहे. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे, सुरांच्या अचूकतेला खूप महत्व देणे, सूर - तालाचा पाया भक्कम करून घेणे, रागांच्या नियमांचे कटाक्षाने पालन करायला शिकवणे, तसेच राग विस्तार करताना रागानुरूप रसोत्पत्तीकडे लक्ष देणे, ही त्यांच्या शिकवण्याची वैशिष्ट्ये आहेत. ते तानपु-याला अनन्यसाधारण महत्व देतात. प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तम लागलेल्या तानपु-यातून उद्भवणारे सर्व स्वर ऐकत रियाज व गायन करावे याकडे त्यांचा कटाक्ष असतो. विद्यार्थ्यांच्या गायनामध्ये गुणवत्ता वाढीस लागावी असे त्यांनी सदैव प्रयत्न केले आहेत व विद्यार्थी केवळ गळ्यानेच नव्हे तर मनानेही कसा गाईल हे पाहिले आहे.



त्यांचे व विद्यार्थ्यांचे नाते हे संगीतापुरते व व्यवहारापुरते मर्यादित नाही. विद्यार्थ्यांना वर्तनादी संस्कार प्रदान करणे, त्यांच्या संगीतेतर शिक्षण / व्यवसायाबाबत आस्था ठेवणे, आजारपण व इतर विविध अडचणीत सक्रीय मदत करणे, आध्यात्मिक मार्गदर्शन करणे, अशा वात्सल्यपूर्वक वागणुकीतून त्यांनी प्रत्येक विदर्यार्थ्यात जिव्हाळा, व कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व असण्याइतकी आपुलकी साध्य केली आहे.

विद्यालयामध्ये गुरुजी सुरवातीला स्वत: तबला व संवादिनी वादन करीत व गायन शिकवीत. शिष्यांमध्ये संगीताची व त्याच्या प्रस्तुतीकरणाची सर्व अंगे विकसित व्हावीत याकरता त्यांनी विविध निमित्तांनी व्यासपीठ निर्माण केले.

मासिक जलस्यांतून शिष्यांना सभाधीटपणा अंगवळणी पडला. वार्षिक स्नेहसम्मेलनांसाठी उत्तम कविता गुरुजींनी स्वत: संगीतबद्ध केल्या व त्या संगीतिका शिष्यांनी सादर केल्या. रियाजाचे महत्व ते आजही सर्वांना विषद करतात व अधिकाधिक मेहनत घ्यायला प्रेरणा देत असतात.

संगीत विश्वातील अनेक ज्येष्ठ, मान्यवर व प्रथीतयश कलाकारांचे कौतुक व प्रेम पं. राम माटे यांना व स्वरसाधना संगीत कला केंद्राच्या शिष्य परिवाराला मिळाले आहे. विविध कार्यक्रमात अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, परिक्षक किंवा कलाकार म्हणून, भारत रत्न पं. भीमसेन जोशी, सुधीर फडके, ग दी माडगूळकर, आबासाहेब मुजुमदार, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा, सरस्वतीबाई राणे, वसंतराव देशपांडे, जीतेंद्र अभिषेकी, भास्कर चंदावरकर, विद्याधर गोखले, उल्हास कशाळकर, विजय कोपरकर, जयतीर्थ मेवुंडी, तसेच, अरविंद थत्ते, रमाकांत परांजपे, पांडुरंग मुखडे, निलेश देशपांडे ... असे अनेक कलाकार लाभले आहेत.

**1984** साली विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षात भारत रत्न पं. भीमसेन जोशी, हरिप्रसाद चौरसिया, परवीन सुल्ताना, मालिनी राजुरकर, झाकिर हुसेन अशा नामवंतांचे गायन - वादन झाले. त्यावेळच्या स्मरणिकेतले पु. ल. देशपांडे, गंगाधर महांबरे, अप्पा जळगावकर, गजाननराव वाटवे व डॉ. श्रीरंग संगोराम यांचे उद्बोधक लेखन आजही संगीताच्या उपासकांना मोलाचे वाटेल.

याशिवाय, आकाशवाणी पुणे केंद्रावर, पं. राम माटे यांनी, अनेक वर्षे स्वरचित्र व इतर कार्यक्रमांतून् संगीत समायोजन व दिग्दर्शन केले आहे. गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत परिक्षा व स्पर्धांना ते वेळोवेळी परिक्षक होते.

गांधर्व महाविद्यालय, मित्र फौन्डेशन व श्रीरंग प्रतिश्ठान तर्फे त्यांचा विषेश गौरव झाला आहे. पुणे येथील आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या, जानेवारी **2010** मधील सवाई गंधर्व महोत्सवात गुरुजींचा विशेष सम्मान झाला. त्यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना गुरुजींनी संगीत कलेच्या सर्व विद्यार्थ्यांना आपला रियाज वाढवण्याचा संदेश दिला.

गुरुजींच्या आशीर्वादाने त्यांचे अनेक विद्यार्थी आज संगीत क्षेत्रात, आकाशवाणी, दूरर्दशन व रंगमंचावरील र्कायक्रम अशा विविध माध्यमांतून, गायन, वादन करून, व ज्ञानदान करून, आपले योगदान देत आहेत.

नुकतीच गुरुजींना **80** वर्षे पूर्ण झाली आहेत व विद्यालयाने सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण केले आहे. आजही गुरुजी आपल्या मृदू स्वभावाने व निर्मळ अंत:करणाने भगवती शारदेची सेवा करीत आहेत.